क्र.पोमसं/४४/ तरतुद / साधनसामुग्री - परिक्षण /१८/२०
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय,
Maharashtra Rajya Police Mukhyalaya,
शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१.
Shahid Bhagat Singh Marg, Colaba
Mumbai - 400 001.
दिनांक - ०६/०६/२०१८.

## पोलीस महासंचालक यांचे स्थायी आदेश क्रमांक. ०१/२०१८

**विषय :- पोलीस दलातील साधनसामुग्री व्यवस्थापन व उपयुक्तता लेखापरिक्षण करणेबाबत.**

*********

महाराष्ट्र पोलीस मुख्यालयामार्फत निरनिराळया घटकांच्या आवश्यकतेनुसार पोलीसांच्या कामातील समन्वय व सक्षमता वाढावी या करीता केंद्रीय पद्धतीने साधनसामुग्री विकत घेण्यात येते. सदर विकत घेतलेल्या साधनसामुग्रीचे व्यवस्थापन व उपयुक्तता लेखापरिक्षण, खालील उद्दिष्ट लक्षात घेवून करणे अत्यंत महत्वाचे आहे.

- संबंधित घटकांना साधनसामुग्रीचे वेळेत वाटप होत आहे याची पडताळणी करणे;
- साधनसामुग्रीच्या पैशाचे मुल्यांकनाच्या दृष्टीने सुयोग्य वापर होत आहे याची पडताळणी करणे;
- साधनसामुग्रीची देखभाल व दुरुस्ती सुयोग्य रितीने होत आहे याची पडताळणी करणे;
- साधनसामुग्रीच्या वापराने पोलीसांची कार्यक्षमता वाढली आहे व त्याचा परिणाम सुरक्षितता सुधारण्यामध्ये झाला आहे किंवा कसे याची पडताळणी करणे;
- सदर साधनसामुग्रीची खरेदी, वाटप व वापरामधील अडचणींचे अवलोकन आणि सुधारणा करणे.

**सदर प्रकारे साधनसामुग्रीचे व्यवस्थापन करण्याकरिता खालील प्रमाणे सुचना देण्यात येत आहेत.**

१) महाराष्ट्र पोलीस मुख्यालयातील अपर पोलीस महासंचालक, नियोजन व समन्वय यांच्या कार्यालयामार्फत केंद्रीय पद्धतीने साधनसामुग्री विकत घेण्यात येते. सदर कार्यालयातील संबधित कार्यासनांनी दर वित्तीय वर्ष अखेरीस (**३१ मार्च**), त्या वर्षात विकत घेतलेल्या साधनसामुग्री बाबत माहिती सोबत जोडलेल्या **विवरणपत्र-अ** प्रमाणे अपर पोलीस महासंचालक, तरतुद यांच्या अधित्याखालील प्रकल्प सुधारणा कक्ष (कार्यासन - ४४) यांना **३० एप्रिल** पर्यंत सादर करावी.

२) अपर पोलीस महासंचालक, तरतुद यांच्या अधिपत्याखालील प्रकल्प सुधारणा कक्ष (कार्यासन - ४४) यांनी सदरची माहिती घटक निहाय व साधनसामुग्रीच्या वर्गवारी निहाय सोबत जोडलेल्या **विवरणपत्र-ब** प्रमाणे तयार करुन अपर पोलीस महासंचालक, प्रशासन यांना **१५ मे** पर्यंत सादर करावी.

३) अपर पोलीस महासंचालक, प्रशासन यांनी सर्व विशेष घटक, आयुक्तालये, परिक्षेत्रीय कार्यालये यांना **विवरणपत्र-ब** प्रमाणे घटक निहाय साधनसामुग्री बाबत माहिती **३० मे** पर्यंत अर्ध शासकीय पत्राद्वारे पाठविण्यात यावी.

४) सर्व परिक्षेत्रीय, विशेष पोलीस महानिरीक्षक यांनी त्यांच्या अधिपत्याखाली असणाऱ्या जिल्हयांचे वेळोवेळी करण्यात येणाऱ्या परिक्षण व भेटी दरम्यान वर नमुद साधनसामुग्री व्यवस्थापना बाबतची उद्दिष्टे प्रमाण मानुन त्या अनुषंगाने सोबत जोडलेल्या **विवरणपत्र - क** प्रमाणे अवलोकन करुन त्याची नोंद घ्यावी व त्याबाबतचा अहवाल, **एका आठवडयाच्या आत** अपर पोलीस महासंचालक, प्रशासन (लक्षवेध :- कार्यासन क्रमांक - १९) यांना सादर करावा.

५) सर्व आयुक्तालयामध्ये वेळोवेळी करण्यात येणाऱ्या परिक्षण व भेटी दरम्यान वर नमुद साधनसामुग्री व्यवस्थापना बाबतची उद्दिष्टे प्रमाण मानुन त्या अनुषंगाने सोबत जोडलेल्या **विवरणपत्र - क** प्रमाणे अवलोकन करुन त्याची नोंद घ्यावी व त्याबाबतचा अहवाल, **एका आठवडयाच्या आत** अपर पोलीस महासंचालक, प्रशासन (लक्षवेध :- कार्यासन क्रमांक - १९) यांना सादर करावा.

६) महाराष्ट्र पोलीस दलातील सर्व विशेष घटकांकडुन वेळोवेळी करण्यात येणाऱ्या परिक्षण व भेटी दरम्यान वर नमुद साधनसामुग्री व्यवस्थापना बाबतची उद्दिष्टे प्रमाण मानुन त्या अनुषंगाने सोबत जोडलेल्या **विवरणपत्र - क** प्रमाणे अवलोकन करुन त्याची नोंद घ्यावी व त्याबाबतचा अहवाल, **एका आठवडयाच्या आत** अपर पोलीस महासंचालक, प्रशासन (लक्षवेध :- कार्यासन क्रमांक - १९) यांना सादर करावा.

७) महाराष्ट्र पोलीस मुख्यालया मार्फत वेळोवेळी करण्यात येणाऱ्या परिक्षणा दरम्यान वर नमुद साधनसामुग्री व्यवस्थापना बाबतची उद्दिष्टे प्रमाण मानुन त्या अनुषंगाने सोबत जोडलेल्या **विवरणपत्र - क** प्रमाणे अवलोकन करुन त्याची नोंद घ्यावी व त्याबाबतचा अहवाल, **एका आठवडयाच्या आत** अपर पोलीस महासंचालक, प्रशासन (लक्षवेध :- कार्यासन क्रमांक - १९) यांना सादर करावा.

संबधित घटकांनी वरील सुचनांची अमलबजावणी करुन वेळोवेळी अनुपालनीय अहवाल सादर करावा.

( सतीश माथुर )
पोलीस महासंचालक
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

**प्रति,**

महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, मुंबई
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्गसह)
अपर पोलीस महासंचालक, ( रारापोबल / वाहतुक / प्रशिक्षण व खास पथके / दहशतवाद विरोधी पथक / लोहमार्ग ), महाराष्ट्र राज्य, मुंबई
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे
संचालक, पोलीस बिनतारी संदेश विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे / महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक / महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक
विशेष पोलीस महानिरीक्षक, फोर्स वन, महाराष्ट्र राज्य, मुंबई / ना.ह.सं. / म.अ.प्र.वि / न.वि.अ., नागपुर
विशेष पोलीस महानिरीक्षक, मोटार परिवहन विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे
विशेष पोलीस महानिरीक्षक, सायबर व गुन्हे विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई /
विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे / नागपुर
पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, कॅम्प नागपुर
पोलीस अधीक्षक, विशेष कृती दल, सुराबर्डी, अमरावती रोड, नागपुर
उप संचालक, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण विद्यालय, नाशिक
सर्व समादेशक, रा.रा.पो.बल, गट १ ते १६
सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण विद्यालय
कार्यासन अधिकारी, कार्यासन क्रमांक, १७/१७-अ/१८/१९/२९

**प्रत माहितीसाठी,**

अपर पोलीस महासंचालक, ( प्रशासन / नि.व.स. ), महाराष्ट्र राज्य, मुंबई
विशेष पोलीस महानिरीक्षक, ( प्रशासन / ~~नि.व.स.~~), महाराष्ट्र राज्य, मुंबई / सहाय्यक पोलीस महानिरीक्षक(निवस)
स्थायी आदेश नस्ती, कार्यासन क्र.३६ (५ प्रती)
पोलीस उप अधीक्षक, संगणक कक्ष, मुंबई
२. पोलीस उप अधीक्षक यांनी सदरचे आदेश पोलीस महासंचालक कार्यालया-च्या संकेतस्थळावर www.mahapolice.gov.in येथे एक महिन्यासाठी उपलब्ध करुन द्यावेत.

विवरणपत्र-अ

-------- वित्तीय वर्षात विकत घेतलेल्या साधनसामुग्रीच्या माहितीचा तपशिल

| अ. क्र. | साधनसामुग्रीची वर्गवारी | साधनसामुग्रीचे नाव व तपशील | प्रमाण/नग | किंमत | विकत घेतलेला दिनांक | वाटपाचा दिनांक | वाटप केलेले घटक | हमी कालावधी | साधनसामुग्रीचा सेवाकाल | विकत घेतल्यानंतरच्या सेवा (असल्यास कालावधी ) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Sr. No. | Category of Asset/ Equipment | Name and Description of Asset | Quantity | Cost | Date of Procurement | Date of distribution | Distribution unit | Guarantee/ Warranty period | Service life of asset | Provision for after sales service (if yes specify period) |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| १ | Crowd Control<br>जमाव नियंत्रण | | | | | | | | | |
| २ | Traffic Regulation<br>वाहतूक नियमन | | | | | | | | | |
| ३ | Investigation including forensics<br>तपास व न्यायवैद्यक | | | | | | | | | |
| ४ | Bomb Detection and Disposal<br>बॉम्ब तपास व निकामीकरण | | | | | | | | | |
| ५ | Surveillance Equipment<br>गुप्तवार्ता | | | | | | | | | |
| ६ | Communication<br>दळणवळण | | | | | | | | | |
| ७ | Specialised Vehicles<br>विशेष वाहने | | | | | | | | | |
| ८ | ICT Equipment including office automation<br>संगणक | | | | | | | | | |
| ९ | Public Awareness<br>जनजागृती | | | | | | | | | |
| १० | Ani-Naxalite Operations<br>दहशतवाद, अतिरेकी व नक्षलवादी कारवायांवर नियंत्रण | | | | | | | | | |

विवरणपत्र-ब

-------- वित्तीय वर्षात विकत घेतलेल्या साधनसामुग्रीची घटकनिहाय माहिती

| अ.क्र | वापरत्या घटकाचे नाव | साधनसामुग्रीची वर्गवारी | साधनसामुग्रीचे नाव व तपशील | प्रमाण/नग | किंमत | ताबा मिळाल्याचा दिनांक | हमी कालावधी | साधनसामुग्रीचा सेवाकाल | विकत घेतल्यानंतरच्या सेवा (असल्यास कालावधी ) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| No. | Name of User Unit | Category of Asset | Name and Description of Asset | Quantity | Cost | Date of handover | Gurantee/ Waranty period | Service life of asset | Provision for after sales service (if yes specify period) |
| | | | | | | | | | |
| अ | **पोलीस मुख्यालय व १५ विशेष घटक** | | | | | | | | |
| १ | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग ACB | | | | | | | | |
| २ | गुन्हे अन्वेषण विभाग CID | | | | | | | | |
| ३ | प्रशिक्षण व खास पथके TRN | | | | | | | | |
| ४ | लोहमार्ग RLY | | | | | | | | |
| ५ | महामार्ग सुरक्षा पथक HSP | | | | | | | | |
| ६ | नागरी हक्क संरक्षण PCR | | | | | | | | |
| ७ | दहशतवाद विरोधी पथक ATS | | | | | | | | |
| ८ | राज्य राखीव पोलीस बल SRPF | | | | | | | | |
| ९ | बिनतारी संदेश विभाग DPW | | | | | | | | |
| १० | विशेष कृती दल SOPS | | | | | | | | |
| ११ | राज्य गुप्तवार्ता विभाग SID | | | | | | | | |
| १२ | मोटार परिवहन MT | | | | | | | | |
| १३ | फोर्स वन F१ | | | | | | | | |
| १४ | सायबर गुन्हे | | | | | | | | |
| १५ | महीला अत्याचार प्रतिबंधक कक्ष (PAW) | | | | | | | | |
| १६ | पोलीस महासंचालक कार्यालय पोलीस मुख्यालय | | | | | | | | |
| | **अ एकूण** | | | | | | | | |
| ब | **९ पोलीस आयुक्तालये** | | | | | | | | |